वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,यांचे कार्यालय अकोला
दरपत्रक (निविदा) बोलाविणेबाबत

जावक क्रमांक/वित्त/2480/२०२५.
जिल्हा न्यायालय, अकोला
दि.१५/०७/२०२५.

प्रति,
.....संकेतस्थळ.....
.....जिल्हा न्यायालय अकोला.

विषय :–UPS 600 VA करिता 12 Volt 7 Amp. (७१नग) बॅटरीचा पुरवठा करण्या करीता दरपत्रक/निविदा सादर करणे बाबत..

महोदय,

वरील विषयास अनुसरुन आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, अकोलास्थीत मुख्यालयी तसेच अधिनस्थ तालुकास्थीत न्यायालयांना पुरविण्यांत आलेल्या यु.पी.एस. 600 VA करीता (Amaron Quanta) कंपनीच्या बॅटरी 12 Volt 7 Amp. परत घेण्याच्या/Buy Back तत्वावर खरेदी करावयाच्या आहेत. त्याकरीता अधिकृत बॅटरी विक्रेत्यांकडुन दरपत्रक (निविदा) मागविण्यांत येत आहेत. तरी आपण आपल्या पाकीटबंद दरपत्रक /निविदा दिनांक २१ जुलै, २०२५ रोजी कार्यालयीन वेळे पर्यंत माननिय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, रेल्वे स्टेशन रोड अकोला या कार्यालयात सादर कराव्यात.

१. निविदेमध्ये दर दर्शवितांना (Amaron Quanta) कंपनी बॅटरी 12 Volt 7 Amp. चे दर जी.एस.टी.करासह तसेच वॉरंटी/गॅरंन्टीसह दर्शविण्यांत यावेत.

२. निविदेमध्ये जुन्या बॅटरी Buy Back तत्वावर घेण्याचे दर स्पष्ट नमुद करावे.

३. दरपत्रक (निविदा) चे बंद लिफाफ्यावर बॅटरी पुरविणे बाबत **दरपत्रक (निविदा)** असे ठळक अक्षरात लिहावे.

४. दरपत्रक (निविदा) दिनांक **२१/०७/२०२५** पर्यंत किंवा त्यापूर्वी **वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रेल्वे स्टेशन रोड, रामदास पेठ, अकोला – ४४४ ००१ यांचे नांवे** या कार्यालयास पोहोचेल अशा बेताने पाठविण्यात यावी. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रक/निविदा स्विकारल्या जाणार नाही, हयांची नोंद घ्यावी.

५. दरपत्रक/निवीदा स्विकारणे व नाकारणे याबाबतचा पुर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अकोला यांनी राखुन ठेवला आहे.

६.निविदा मंजुर झाल्यानंतर बॅटरीचा पुरवठा जिल्हा व सत्र न्यायालय,रेल्वे स्टेशन रोड,अकोला येथे त्वरीत करावा लागेल. देयक हे व्दीप्रतीत सादर करण्यांत यावे. देयक अदायगी करीता CMP आवश्यक आहे. नसल्यास एक मुळ रद्द केलेला धनादेश व पॅन कार्डची छायांकीत प्रत सादर करावी लागेल.

आदेशान्वये
अधिक्षक
वित्त विभाग, जिल्हा न्यायालय,अकोला.